SPB
SHRI PISARNATH
BROADBAND
श्री.संतोष अरविंद शेलार - उपनगराध्यक्ष, माथेरान, ८७९३३११०४४
संत गाडगे महाराज रोड, माथेरान रेल्वे स्टेशनच्या मागे
ता.कर्जत जि. रायगड (माथेरान) - ४१०१०२

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर
छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती, संचलित
कला विज्ञान व वाणिज्य निवासी महाविद्यालय
ता.सोयगांव जि.छत्रपती संभाजीनगर
मा.खा.रावसाहेब पाटील दानवे (अध्यक्ष) (माजी रेल्वे, कोळसा व खान केंद्रीय राज्यमंत्री)
मा.सौ.निर्मलाताई रावसाहेब पा.दानवे (सचिव) (छ.श्री.शिवाजी महाराज स्मारक समिती भोकरदन)
मा.आ.संतोष रावसाहेब पा.दानवे (भोकरदन जाफ्राबाद विधानसभा)
BA, Bcom, Bsc First Year विद्यार्थ्यांसाठी १५ जून २०२६ पासून प्रवेश सुरु
श्री.विजय देसाई : 9403251705

वर्ष : ०५ | अंक : ३१५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.२६ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## संजय दिना पाटील यांची पत्रकारांना धमकी आणि शिवीगाळ

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षात प्रवेश करणारे ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांनी शिवीगाळ केली आहे. संजय दिना पाटील यांच्या या कृत्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. आपलं या विषयावर संजय दिना पाटील यांच्यासोबत चर्चा झाली, असल्याचं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं आहे. पत्रकारांबाबत त्यांनी केलेलं वक्तव्य चुकीचं आहे. आपण त्यांना दिलगिरी व्यक्त करण्यास सांगितलं असल्याचं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं. तर मंत्री संजय शिरसाट यांनी संजय दिना पाटील यांच्या वतीने आपण माफी मागत असल्याचं म्हटलं.

**एकनाथ शिंदे नेमकं काय म्हणाले?**

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत रोज संजय दिना पाटील यांच्या विरोधात बोलतात. रोज त्यांच्याबद्दल अपशब्द काढतात. तोडून टाका, मारुन टाका, घरात घुसा आणि अतिशय खालच्या दर्जाच्या नीच दर्जाचे शब्द मीडियासमोर वापरतात.




खरं म्हणजे हा मीडियाचादेखील अपमान आहे. किती वेळापासून काय-काय बोलतात ते आपण पाहिलेलं आहे. याचा राग संजय दिना पाटील यांच्या मनामध्ये आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

संजय दिना पाटील यांच्या मनात पत्रकारांबाबत कोणताही राग नाही. पत्रकारांच्याबाबत अशा प्रकारचे वक्तव्य आमच्यासारख्या कोणत्याही लोकप्रतिनिधीने करुही नये. त्यामुळे मी त्यांना सांगितलं आहे की, आपल्याकडून पत्रकारांचा अपमान करणारे काही शब्द गेले असतील तर आपण पत्रकारांशी बोलून दिलगिरी व्यक्त केली पाहिजे, अशी प्रतिक्रिया एकनाथ शिंदे यांनी दिली.

**संजय शिरसाट म्हणाले, 'मी माफी मागतो'**

संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना वेडं-वाकडं बोलले असतील तर मी त्यांच्यातर्फे माफी मागतो. दिना पाटील यांनाही आम्ही आमच्या पद्धतीने बोलू. एखाद्या वेळेत फ्रस्टेशन किंवा जास्त राग आल्यामुळे ते तसं बोलले असतील, अशी प्रतिक्रिया मंत्री संजय शिरसाट यांनी दिली आहे.

**'याचं समर्थन करता येणार नाही'**

गेल्या तीन-चार दिवसांपासून संजय दिना पाटील आणि संजय राऊत यांच्यत वाकयुद्ध चालू आहे. कुणी बॉम्बने उडवून देण्याची धमकी देत आहे. कुणी फोटो काढवून दाखवत आहे, या अशा प्रकारच्या घटना आम्हाला बघायला मिळत आहेत. या अशा प्रकारच्या घटना आम्हाला पाहायला मिळत आहेत. याचं समर्थन कुणीही करणार नाही, असं स्पष्ट मत संजय शिरसाट यांनी व्यक्त केलं.

**'राजकारणतील हा प्रकार चुकीचा'**

कुणीही कुणाला अशी उघडपणे धमकी देत नसतं. किंवा उघडपणे बोलत नसतं. पण त्यांच्या भावनेचा उद्रेक झाल्यामुळे त्यांच्या तोंडातून ते वाक्य निघालं असावं. आजही काही पत्रकार गेले त्यावेळी ते चिडले होते. काही लोकांनी असा प्रश्न उपस्थित केला की, एकनाथ शिंदे यांनी त्यांना समज दिली किंवा एकनाथ शिंदे त्यांच्यावर नाराज आहेत.

याबद्दलच्या बातम्या आहेत. संजय दिना पाटील यांचं एकनाथ शिंदे यांच्यासोबत बोलणं झालं आहे. महाराष्ट्रात राजकारणात जो प्रकार बघायला मिळतोय ते चुकीचं आहे, असंही संजय शिरसाट म्हणाले.

## म्हाडा वसाहतीतील मूलभूत सुविधांचा अभाव दूर करा; १२३ पात्र लाभार्थ्यांना तातडीने घरे द्या : आ. जोरगेवार




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, चंद्रपूर :** चंद्रपूर येथील म्हाडा वसाहतीतील मूलभूत सुविधांचा अभाव तसेच १२३ पात्र लाभार्थ्यांच्या घरांचा प्रलंबित प्रश्न पावसाळी अधिवेशनात औचित्याच्या मुद्द्याद्वारे उपस्थित करत आमदार किशोर जोरगेवार यांनी राज्य शासनाचे लक्ष वेधले. वसाहतीत आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासह त्रयस्थ एजन्सीकडून पात्र लाभार्थ्यांची झालेल्या आर्थिक फसवणुकीची चौकशी करून १२३ पात्र लाभार्थ्यांना तातडीने घरे देण्याची मागणी त्यांनी यावेळी केली.

सभागृहात बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, मानवी जीवनासाठी अन्न, वस्त्र आणि निवारा या तीन मूलभूत गरजा आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने कोट्यवधी नागरिकांना मोफत धान्य उपलब्ध करून अन्नाची गरज पूर्ण करण्याचे मोठे कार्य केले आहे. मात्र, सर्वांना घरे देण्याचा संकल्प पूर्ण करण्यासाठी गृहनिर्माण क्षेत्रात अधिक प्रभावी कार्यवाही होणे आवश्यक आहे.

चंद्रपूर येथील म्हाडा वसाहत सुमारे ४५ वर्षांपूर्वी स्थापन झाली असली, तरी आजही तेथे वीज, रस्ते आणि पाणी यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. आवश्यक सोयी-सुविधा नसल्यामुळे नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून अपेक्षित प्रमाणात लोकवस्तीही विकसित झालेली नाही. परिणाम, येथील रहिवाशांना अक्षरशः नरक यातना भोगाव्या लागत असल्याचे त्यांनी सभागृहात सांगितले.

यावेळी आ. जोरगेवार यांनी म्हाडा वसाहतीच्या सर्वांगीण विकासाची मागणी केली. ४५ वर्षांपूर्वी तयार करण्यात आलेल्या विकास आराखड्याचा फेरविचार करून शिक्षण, आरोग्य आणि इतर सार्वजनिक सुविधांसाठी नव्याने नियोजन करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली. तसेच, म्हाडाने नियुक्त केलेल्या त्रयस्थ एजन्सीकडून १२३ नागरिकांची फसवणूक झाल्याचा मुद्दाही आ. जोरगेवार यांनी अधिवेशनात उपस्थित केला. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित १२३ नागरिकांना त्यांच्या हक्काची घरे देण्यात यावीत, अशी मागणी त्यांनी केली. लाभार्थ्यांनी भरलेली रक्कम विचारात घेऊन उर्वरित प्रक्रिया पूर्ण करत त्यांना तातडीने घरे देण्याचा निर्णय शासनाने घ्यावा, असेही ते यावेळी म्हणाले.

## मुजोर खा.संजय दिना पाटलांचा पाटण तालुका पत्रकार संघाच्यावतीने जाहीर निषेध

**– विक्रांत कांबळे, अध्यक्ष, पाटण तालुका पत्रकार संघ**

पत्रकार हा नेते व शासकीय अधिकारी यांच्यातील दुवा असतो. शासनाच्या विविध योजना, नेते मंडळींनी केलेली कामे सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम पत्रकार करतो. मात्र काही मस्तवाल नेते, खासदार पत्रकारांच्याबाबतीत अर्वाच्य शब्द वापरून धमकीची भाषा वापरत असतील तर पत्रकारही त्यांना त्याच पध्दतीने धडा शिकवल्याशिवाय राहणार नाहीत. खा. संजय पाटील याने केलेल्या वक्तव्याचा पाटण तालुका पत्रकार संघ जाहीर निषेध व्यक्त करत आहे. यापुढे असे वक्तव्य खपवून घेणार नाही, पत्रकार रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही.

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२५, पाटण :** पत्रकारांना जीवे मारण्याची धमकी देणार्या मुजोर खासदार संजय दिना पाटील याचा पाटण तालुका पत्रकार संघाच्यावतीने गुरूवारी तीव्र शब्दात जाहीर निषेध करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांना दिलेल्या धमकीची दखल घेऊन संजय दिना पाटील याचा राजीनामा घेवून त्याच्यावर कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी पाटण तालुका पत्रकार संघाच्यावतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन प्रांताधिकारी सोपान टोम्पे व तहसीलदार अनंत गुरव यांना देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे, खा. संजय दिना पाटील याने मुंबई येथे पत्रकारांच्याबाबतीत शिवराळ भाषा वापरुन जीवे मारण्याची धमकी दिली. संविधानात्मक पद असलेल्या अशा व्यक्तीस लोकशाहीचा चौथा स्तंभ संभाळणार्या पत्रकारांच्या बाबतीत अशी शिवराळ भाषा अशोभनीय आहे. अशा मस्तवाल खासदाराचा अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद संलग्न पाटण तालुका पत्रकार संघ जाहीर निषेध करत असून लोकशाहीला काळीमा असणार्या खासदाराचा तात्काळ राजीनामा घेऊन त्याच्यावर पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करावा, अशी मागणी पाटण तालुका पत्रकार संघाच्यावतीने करण्यात आली आहे.

याप्रसंगी प्रांताधिकारी सोपान टोम्पे व तहसीलदार अनंत गुरव यांना निवेदन देण्यात आले.





शंकरराव मोहिते, सदस्य पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती महाराष्ट्र राज्य

मुंबई येथे खा. संजय दिना पाटील याने पत्रकारांच्याबाबतीत अर्वाच्य भाषा वापरून जीवे मारण्याची धमकी दिली आहे ही निषेधार्ह्य बाब आहे. संविधानात्मक पद असलेला हा खासदार लोकशाहीला काळीमा ठरलेला आहे. अशा खासदाराला पदावर राहण्याचा कोणताही अधिकार नाही. अशा मुजोर खासदाराचा पंतप्रधान व मुख्यमंत्र्यांनी तात्काळ राजीनामा घ्यावा त्याला बडतर्फ करावे.

यावेळी पत्रकारांनी तीव्र शब्दात खा. संजय दिना पाटील यांच्या वक्तव्याचा जाहीर शब्दात निषेध व्यक्त केला. निवेदन देतेवेळी पाटण तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रांत कांबळे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती सदस्य शंकरराव मोहिते, महिला राज्य सरचिटणीस विद्या म्हासुर्णेकर, सचिव नितीन खैरमोडे, सहसचिव राजेंद्र सावंत, उपाध्यक्ष संदेश बनसोडे, पत्रकार , सुरेश संकपाळ, निलेश साळुंखे,संजय कांबळे, बाबासाहेब सुतार, योगेश हिरवे, खाशाबा चव्हाण आदींसह पत्रकार उपस्थित होते.

## तुकाराम मुंढेंचा कारवाईचा धडाका, महिन्याभरात तब्बल ३४ कोटींचा गुटखा जप्त



**दि.२५, मुंबई :** अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याकडून गेल्या महिन्याभरापासून प्रतिबंधित अन्नपदार्थ पान मसाला, गुटखा विक्री, वितरण, वाहतूक या विरोधात कठोर कारवाई केली जात आहे. विशेष म्हणजे अन्न आणि औषध प्रसासनाने २५ मे २४ मे या महिन्याभराचा कालावधीत तब्बल ९०४ ठिकाणी धाडी टाकल्या आहेत. या धाडीत तब्बल ३४ कोटी ६६ लाख, ९० हजार ६२४ रुपयांचा गुटखा आणि इतर वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत. या कारवाईत आतापर्यंत एकूण ४५७ जणांना अटक करण्यात आली आहे. तसेच ३२२ आस्थापना सील करण्यात आल्या आहेत. यासोबतच ४२ वाहन जप्त करण्यात आले आहेत. अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी २५ मे ते २४ जून दरम्यान मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर या विभागात प्रतिबंधित गुटखा, पानमसाला विक्रेते आणि नियमभंग करणाऱ्या आस्थापनाविरुद्ध कारवाई केली. त्यामध्ये कोकण विभागात १५५ आस्थापनाविरुद्ध कारवाई करून २८,७७,२०२ रु. किमतीचा माल, जप्त करण्यात आला. तसेच या कारवाईत १५६ व्यक्तींस अटक करण्यात आली आहे. मुंबई विभागात ९० आस्थापनाविरुद्ध कारवाई करून ३९,०२,५३५ रु. किमतीचा माल, जप्त करण्यात आला आणि ८९ व्यक्तींस अटक करण्यात आली आहे.

**नाशिक आणि नागपूर विभागात कारवाई**

नाशिक विभागात ३१ आस्थापनाविरुद्ध कारवाई करून १,४३,२६,६०६ रु. किमतीचा माल जप्त करण्यात आला. या कारवाईत २९ व्यक्तीस अटक करण्यात आली. नागपूर विभागात ३८ अस्थापनांची तपासणी करून ९६,८८,३८१ रुपये किमतीचा माल जप्त केला आहे. तसेच २९ व्यक्तींना अटक केली आहे.

**पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि अमरावती विभागातही कारवाई**

पुणे विभागात ८७ आस्थापनाविरुद्ध कारवाई करून ८४,८९,८८९ रुपये किमतीचा माल जप्त करण्यात आला तर छत्रपती संभाजीनगर विभागात ३८ आस्थापनाविरुद्ध कारवाई करून ९६,८८,३८१ रुपये किमतीचा माल आणि १३ वाहन जप्त करण्यात आले. अमरावती विभागात करण्यात आलेल्या कार्यवाहीमध्ये २५ अस्थापनेवर कारवाई करून १,१४,७१,५०२ रुपये किमतीचा माल जप्त करण्यात आला आहे.

**अन्न पदार्थांवरही कठोर कारवाई**

राज्याच्या अन्न व औषध प्रशासन यांच्या Safe Food, Safe Drug, Safe Maharashtra ह्या संकल्पनेअंतर्गत अन्न व औषध प्रशासनातर्फे महाराष्ट्र राज्यात कायदेशीर तरतुदींचे उल्लंघन करून अनारोग्यदायी व अस्वच्छ वातावरणात अन्न पदार्थ उत्पादन करणाऱ्या आस्थापनांविरोधात धडक मोहिम राबविण्यात येत असून सदर मोहिमेअंतर्गत अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी राज्यातील विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर छापे टाकून संबंधित अन्न व्यावसायिकांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. या मोहीमेत अन्न व औषध प्रशासनामार्फत मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, नागपूर व अमरावती या विभागात संशयित कमी दर्जा/असुरक्षित अन्नपदार्थ तसेच अस्वच्छ उत्पादन प्रक्रिया आणि लेबल दोष, मिथ्या छाप व भ्रामक जाहिरात केल्याकारणाने यावर कठोर कारवाई करण्यात आली आहे.

## शेतकऱ्यांना कौटुंबिक मंगल कार्यासाठी एसटी सवलतीच्या दरात मिळणार

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२५, मुंबई :** राज्यातील शेतकरी कुटुंबांना लग्नसमारंभासाठी तथा कुटुंबातील इतर मंगल कार्यासाठी एसटी बस सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिली जाणार आहे, तसेच अवैध प्रवासी करणाऱ्या वाहनांचे परवाने रद्द करण्यात येईल, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी गुरुवारी विधान परिषदेत केली.

मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर डहाणू तालुक्यात साखरपुड्यासाठी निघालेल्या वऱ्हाडाच्या ट्रकला झालेल्या अपघाताच्या अनुषंगाने उबाठा गटाचे सदस्य सुनील शिंदे यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना ते बोलत होते.

शेतकरी कुटुंबात लग्न किंवा अन्य शुभकार्यांसाठी अनेकदा ट्रक, डंपर किंवा अन्य अवैध वाहनांचा वापर करतात. ही बाब लक्षात घेऊन महामंडळाकडे नवीन बसचा ताफा दाखल झाल्यानंतर शेतकरी कुटुंबात मुलगा किंवा मुलीचे लग्न असेल



आणि त्यांनी एसटीकडे बसची मागणी केली, तर एसटी महामंडळ त्यांच्या दारापर्यंत बस पोहोचविण्यासाठी प्रयत्न करेल.

राज्यात वाढत्या लोकसंख्येमुळे रेल्वे, मेट्रो, एसटी आणि बेस्ट यांसारख्या सार्वजनिक वाहतूक सेवांवर ताण वाढला असून त्याचा फायदा अवैध प्रवासी वाहतूक करणारे घेतात. ही परिस्थिती बदलण्यासाठी राज्य शासनाने ८,३०० नवीन एसटी बस खरेदी करण्याचा निर्णय घेतला असून त्या टप्प्याटप्प्याने सेवेत दाखल होत आहेत. काही मार्गांवर प्रत्येक तासाला आणि पुढील दोन-तीन महिन्यांत दर अर्ध्या तासाने एसटी बस सेवा सुरू करण्यात येणार आहे. तसेच अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या सहकार्याने व्यापक सुरक्षा आराखडा तयार करण्यात आला असून प्रत्येक जिल्ह्यातील 'ब्लॅक स्पॉट'ची ओळख करून तेथे आवश्यक उपाययोजना करण्यात येणार आहेत. अटल सेतू, समृद्धी महामार्ग आणि मुंबई पुणे द्रुतगती मार्गासारख्या प्रमुख रस्त्यांवर आपत्कालीन वैद्यकीय सुविधांनाही बळकटी देण्यात येणार आहे. राज्यात लवकरच 'ॲग्रीगेटर पॉलिसी' जाहीर करण्यात येणार असून छोट्या वाहनांना नियमनबद्ध चौकटीत प्रवासी वाहतुकीची संधी देण्याचा विचार सुरू आहे. रॅपिडो, ओला आणि उबरसारख्या कंपन्यांकडून नियमबाह्य पद्धतीने चालवल्या जाणाऱ्या बाईक टॅक्सी सेवांबाबतही शासन गंभीर असून कायदेशीर चौकट मजबूत केली जाईल, अशी ग्वाही सरनाईक यांनी दिली.

अक्षराज






## भारतमातेचे थोर सुपुत्र- चापेकर बंधू !

राष्ट्रकार्यासाठी तीन सख्या बंधूंनी बलिदान देण्याचे जगातील एकमेव उदाहरण म्हणजे चापेकर बंधू, त्यापैकी थोरले दामोदर हरि चापेकर यांची जयंती नुकतीच २५ जूनला पार पडली. चापेकरांचे घराणे मूळचे कोकणातील वेळणेश्वरचे; मात्र त्यांचे पूर्वज पुण्याजवळील चिंचवडला येऊन स्थायिक झाले. तेथेच २५ जून १८६९ या दिवशी दामोदरपंतांचा जन्म झाला. लहानपणापासूनच दामोदरपंत आणि त्यांचे दोन्ही बंधू बाळकृष्ण आणि वासुदेव यांचा ओढा हिंदुस्थानला परदास्यातून मुक्त करण्याकडे होता. क्रांतीकार्याची आवश्यकता म्हणून ते प्रतिदिन बाराशे सूर्यनमस्कार घालीत, तसेच एका तासात अकरा मैल पळण्याचाही वेग त्यांनी प्राप्त केला होता. दामोदर यांच्यावर लहानपणापासूनच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या विचारांचा आणि देशप्रेमाचा मोठा प्रभाव होता. ते राष्ट्रभक्ती आणि व्यायामाचे भोक्ते होते. दाम ोदरपंतांचे वडील हरिभाऊ हे कीर्तनकार आणि प्रवचनकार होते. प्रत्येक चातुर्मासात मुंबईला जाऊन प्रवचने करण्याचा त्यांचा प्रघात होता. १८९६ च्या चातुर्मासात वडिलांबरोबर साथीला गेलेल्या दामोदर आणि बाळकृष्ण यांनी तेथील राणी व्हिक्टोरियाच्या पुतळ्याला डांबर फासून जोड्यांची माळ घातली. या काळात काँग्रेसच्या अधिवेशनांचा प्रारंभ ब्रिटिशांच्या राणीच्या स्तवनाने होत असे, हे माहीत असलेल्यांना या धाडसी कृत्याचे मोल कळेल !

१८९६ साली ग्रंथिक सन्नीपात (प्लेग) हा रोग पुण्यात झपाट्याने पसरू लागला. सरकारने या साथीचा बंदोबस्त करण्यासाठी 'रँड' नावाच्या आय. सी.एस. अधिकार्याची नेमणूक केली. त्याचे गोरे सैनिक घरे तपासण्याच्या निमित्ताने नागरिकांवर अत्याचार करू लागले. घरातील देवघराची विटंबना करू लागले. पुण्यातील हे अत्याचार चापेकर बंधूंच्या अंत:करणात प्रतीशोधाची आग पेटवत गेले. रँडचा सूड घेण्याची संधी चापेकरबंधूंना लवकरच मिळाली. १८९७ हे वर्ष राणी व्हिक्टोरियाच्या राज्यकारभाराचे ६० वे वर्ष होते. त्या निमित्ताने पुण्यातही गणेश खिंडीतील राजभवनावर एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. २२.६.१८९७ या रात्री गणेश खिंडीतील समारंभ आटोपल्यावर रँड आणि लेफ्टनंट आयर्स्ट आपापल्या स्वतंत्र घोडागाड्यांतून निघाले. आयर्स्टची घोडागाडी पुढे होती. वासुदेवरावांची 'गोंद्या आलाऽ रे आला ' ही परवलीची आरोळी ऐकताच आणि रँडसारखी दिसणारी आयर्स्टची घोडागाडी दिसताच बाळकृष्ण चालत्या घोडागाडीत शिरले आणि त्यांनी त्यांचे 'रिव्हॉल्व्हर' आयर्स्टच्या मस्तकात रिकामे केले. तरीही लांबून येणारी परवलीची आरोळी थांबत नाही, हे कळताच दामोदरपंत काय ते समजले. बाळकृष्णपंतांनी हिरावून घेतलेली संधी परत मिळाल्याचा आनंदही त्यांना झाला. रँडच्या गाडीमागे धावणार्या वासुदेवरावांना थांबवून त्यांनी स्वत: गाडीवर उडी घेतली. छपरावरील पडदा बाजूला सारून त्यांनी पाठमोर्या रँडवर आपले रिव्हॉल्व्हर मोकळे केले. दामोदरपंत कार्यसिद्धीच्या आनंदात गाडीवरून खाली उतरले; पण दोन्ही घटना गाडीहाक्यांच्या ध्यानातच आल्या नाहीत. काही म हिन्यांनी द्रविड बंधूंच्या चुगलखोरीमुळे दामोदरपंत आणि बाळकृष्णपंत यांना पकडण्यात आले. त्यांच्यावर अभियोग चालून १८.४.१८९८ या दिवशी दामोदरपंतांना पुण्याच्या येरवडा कारागृहात फाशी देण्यात आली. फाशीच्या पाळण्यावर जाताना त्यांच्या हातात लोकमान्य टिळकांनी दिलेली 'श्रीमद्भगवद्गीता' होती. २.५.१८९९ या दिवशी बाळकृष्णपंतांनाही फाशी देण्यात आले. चापेकर बंधूंची ही कहाणी एवढ्यावरच संपली नाही. द्रविड बंधूंच्या चुगलखोरीची माहिती कळताच धाकटे वासुदेवपंत संतप्त झाले. महादेव रानडे नावाच्या मित्राच्या साहाय्याने त्यांनी चुगलखोर द्रविडबंधूंना ठार मारले आणि ८.५.१८९९ या दिवशी ते स्वत: फासावर चढले रँडच्या वधाच्या वेळी दामोदरपंतांचे वय होते २७ वर्षे, मधल्या बाळकृष्णपंतांचे वय होते २४ वर्षे आणि धाकट्या वासुदेवरावांचे वय होते १८ वर्षे ! या विशी-पंचवीशीतील तरुणांचा असीम त्याग आणि शौर्य पाहून आजही उर अभिमानाने भरून येतो ! तीन सख्या भावांनी राष्ट्रकार्यासाठी केलेले हे बलीदान जगात एकमेव आहे ! चापेकर बंधूंचे हे सर्वोच्च बलिदान भारतीय स्वातंत्र्यलढ्यात मैलाचा दगड ठरले. त्यांच्या या अदम्य साहसाने पुढे स्वातंत्र्यवीर सावरकर आणि अनंत कान्हेरे यांच्यासारख्या शेकडो तरुणांना सशस्त्र क्रांतीची प्रेरणा दिली. **(साभार : बालसंस्कार डॉट कॉम)**

**- जगन घाणेकर**

# लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज !

आज २६ जून, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती. आजच्याच दिवशी १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूर ( करवीर ) संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी आनंदीबाई यांनी कोल्हापूरच्या गादीचे वारसदार म्हणून त्यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले कारण चौथे शिवाजी महाराज यांना मुलबाळ नव्हते.

दत्तक घेतल्यावर त्यांचे छत्रपती शाहू महाराज असे नामकरण करण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. राज्यभिषेक झाल्यावर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी म हाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला म्हणूनच ते राजर्षी बनले. ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतूम बाहेर काढून, तत्कालीन रूढी परंपरा नाकारुन त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या. शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला.

त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शिक्षणाचे महत्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण



विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधर्मातील मुलांसाठी त्यांनी २२ वसतिगृहे स्थापली त्यात शेकडो मुले शिकली. शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना ४० रुपये स्कॉलरशिप सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते.

अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दृष्ट पद्धत रद्द केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक विचार डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात. शाहू महाराजांच्या या निर्णयाला तेंव्हा खूप विरोध झाला पण विरोधाला न जुमानता त्यांनी या आरक्षणाची कठोर अंमलबजावणी केली.

शाळा, दवाखाने, पाणवठे अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांशी समतेने वागावे, त्यांच्याशी कोणीही भेदभाव करू नये असा आदेश त्यांनी काढला. १९१७ साली विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांनी देवादासींची घातक प्रथा बंद केली. बहुजन सम ाजाला राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी १९१६ साली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जातिभेदाची प्रथा नष्ट व्हावी म्हणून त्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. इतकेच नाही तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. छत्रपती शाहू महाराजांनी स्पिनिंग अँड व्हीविंग मिल, शाहूपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन देणे असे अनेक उपक्रम आपल्या संस्थानात राबवले. त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी संशोधनाला पाठिंबा दिला.

नगदी पिके आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिट्यूटची स्थापना केली. चित्रकला, लोककला, संगीत, साहित्य, नाट्य, कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना त्यांनी राजाश्रय मिळवून दिला. शाहू महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रुत आहे. बाबासाहेब मॅट्रिकमध्ये असताना आणि नंतर कोलंबिया युनिव्हर्सिटीत शिकत असताना त्यांनी बाबासाहेबांना स्कॉलरशिप दिली. २० आणि २१ मार्च १९२० रोजी माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषदेत शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करून कोल्हापूरच्या राजवाड्यात त्यांना जेवणाचे निमंत्रण दिले.


डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे साप्ताहिक सुरू केले पण आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद करावे लागले जेंव्हा हे शाहू म हाराजांना समजले तेंव्हा त्यांनी २५०० रुपयांची आर्थिक मदत देऊन हे साप्ताहिक पुन्हा सुरू केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा समर्थपणे पुढे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक मानवतावादी राजा म्हणून शाहू महाराजांची इतिहासात नोंद आहे. व्यापक दूरदृष्टीच्या या राजाने त्याकाळी राजेशाही असूनही सामाजिक बंधुभाव, दलित व उपेक्षितांचा उद्धार, शिक्षण, उद्योगधंदे, कला, क्रीडा, आरोग्य या क्षेत्रांमध्ये जे कार्य केले आहे तसे कार्य आजवर कोणीही केले नाही. त्यांचे कार्य आजच्या आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहे. आज त्यांचा जन्म दिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो ही एकप्रकारे त्यांच्या कार्याला दिलेली मानवंदनाच आहे. जयंतीदिनी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना विनम्र अभिवादन!

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# किमया पहिल्या पावसाची!

उन्हाळ्यातील मागील तीन ते चार महिने उष्णतेच्या दाहकतेचे चटके सहन करत सृष्टीतील सर्व सजीव घटक साधारण इंग्रजी महिन्यातील जून मध्ये पावसाची आतुरतेने वाट पाहत असतात.या सृष्टीतील प्रत्येक सजीव घटक हा पाण्यावाचून जगू शकत नाही.उन्हाळ्यात पशुपक्षी पाण्याच्या भटकंतीसाठी कितीतरी मैल प्रवास करतात.पक्षी स्थलांतरित होतात.वनातील पक्षी जेथे पाण्याचा डोह-तलाव सापडेल तेथे वास्तव्य करतात.वन्य प्राणीसुद्धा पाण्याच्या शोधार्थ भटकंती करतात. त्यामुळे बिबट्या, वाघ, माकडे,अस्वल कोल्हे हे गावांकडे व शहरांकडे धाव घेताना दिसून येतात. त्याचबरोबर पाळीव प्राण्यांसाठी शेतकरी तथा पशुपालक पाण्याची व्यवस्था करतात.काही सम ाजसेवी संस्था पशु, पक्षी व प्राणीमात्रासाठी कृत्रिम पानवठे तयार करतात.यातून भूतदया दिसून येते. वनातील वृक्षवेली पाण्या वाचून सुकतात.वृक्षांची पानगळ होते. सभोवतालचे वातावरण अगदी भकास जाणवते. मात्र निसर्गाच्या ऋतुचक्रानुसार ऋतुंच्या रचनेप्रमाणे हे वातावरण सुद्धा आगामी ऋतूसाठी आवश्यक असतेच....!

उन्हाळ्याची दाहकता सहन करून शेतकरी राजा पेरणीपूर्व मशागत करून शेती पेरणीलायक करून ठेवतो व पावसाची आतुरतेने वाट पाहतो. पावसाच्या प्रतीक्षेचा काही काळ ओलांडल्यानंतर पावसाच्या आगमनास उशीर झाल्यास, दर तीन वर्षांनी येणाऱ्या अधिकमासात खेड्यापाड्यात पूर्वी धोंडी धोंडी पाणी दे हे गीत गावून गावातील मंडळी लोकनृत्य सादर करून निसर्गदेवाकडे पाण्याची मागणी करायचे.या अधिक मासाला ग्रामीण भाषेत धोंड्याचा महिना सुद्धा म्हणतात. हा महिना नेमकं पावसाळ्याच्या तोंडावर असतो, म्हणून त्या धोंड्यालाच ही भरघोस पावसाची मागणी असावी असे दिसून येते.अजूनही काही भागात ही लोकपरंपरा कायम आहे.गावातील शेतकरी, हातमजूर मंडळी कमरेला लिंबाच्या झाडाच्या फांद्या बांधायचे.डोक्यावर गांधी टोपी,हातात काठी घेऊन आभाळाकडे काठी करून दोन्ही हात जोडायचे. गोल रिंगण करून गल्लीमध्ये हलगी अर्थात दफड्याच्या तालावर धोंडी धोंडी पाणी दे नृत्य करत असतांना म हिलावर्ग घरातून कळशी, हंडा अथवा लोटाभर पाणी आणून त्या नृत्य करणारे गावातील शेतकरी वर्ग, कामगार वर्ग तथा लहान चिमुकल्या म ुलांच्या अंगावर धुलिवंदना सारखं शिंपडायच्या. हलगीच्या तालावरील हे नृत्य अतिशय मनमोहक वाटायचे.गावभर हलगी, दफडे वाजवणारा वादक सुद्धा देहभान विसरून त्या नृत्यांमध्ये सहभागी व्हायचा. काहिजण घरातून पसा दोन पसा भरून ज्वारी, गहू, डाळी सुद्धा त्यां कलाकारांना दान म्हणून द्यायचे. मात्र हे धान्य ते स्वतःच्या घरी घेऊन न जाता गावातील पारावर जमा करायचे व त्या दानस्वरूप धान्याचा सर्व गावातील लोक मिळून सार्वजनिक भंडारा करायचे. त्याचाच निसर्गदेवतेला नैवेद्य अर्पण करायचे. भरपूर पावसासाठी वरूण राजा अर्थात निसर्ग देवतेला साकडे घालायचे.देवांचे पाणी अर्थात वर्षा ऋतूंचे पाणी मागणे या मध्ये कुणाचाही वैयक्तिक स्वार्थ




नसायचा.आणि नसतोच मुळी...!जात-पात धर्म पंथ याचाही लवलेश नव्हता, म्हणून सर्व जाती-धर्मातील लोक सहभागी व्हायचे. अजूनही ही लोक परंपरा जिथे कायम आहे तेथे सर्व जाती-धर्मातील लोक सहभागी होतात.

या लोकपरंपरेमागे श्रद्धा अथवा अंधश्रद्धा हा तर्क नव्हताच. होता तो फक्त आंतर्मनातील शुद्ध-भाव...! निसर्गस्वरूप भगवंतांच्या चरणी केलेली विनवणी..! तोही अशा कुठला शेंदुराचा देव नव्हता, किंवा दगडाचा देव नव्हता तर तो होता निसर्गदेव...!या देवतेला अर्थात आभाळाकडे हात जोडून शुद्ध अंतर्मनातून केलेली प्रार्थना होती.यामागे भाव होता तो मानवकल्याणाचा.म ुक्या प्राण्यांच्या,वृक्षवेलींच्या हिताचा.ही परंपरा अजूनही काही भागात आहेच तर या धोंडी धोंडी पाणी दे म्हणणाऱ्या भोळ्या-भाबड्या गावकऱ्यांचे गाऱ्हाणे ऐकून,आर्त हाक ऐकून जमिनीवरील कानाकोपऱ्यात त्याचा थेंब पडल्यास, या सृष्टीतील गवत,छोटी रोपटे,झूडपे वाढीस लागतात.बरसणारा हा पाऊस या सृष्टीवर नवचैतन्य घेऊन येतो. वृक्ष-वेली झाडी -झुडपे यामध्ये नवचैतन्य येऊन त्यावर, पक्षी वास्तव्य करतात.वातावरणात गारवा येतो. नद्या-नाल्यांना पूर येतो. विहिरी तुडुंब भरतात त्यामुळे खरिपातील पिकानंतर रब्बीतील अर्थात हिवाळ्यातील पिकांना त्याचा सहारा होतो. गुराढोरांना पिण्यास मुबलक प्रमाणात पाणी मिळते. शेताच्या बांधावर गवत उगवते.जंगल, वने, रस्त्यांच्या दुथर्फा छोटी-छोटी रानटी झुडपे, गवत वाढीस लागून भटक्या वन्य प्राण्यांना तथा पाळीव प्राण्यांना जसे की गाय, म्हैस,शेळी,मेंढी यांना लुसलुशीत हिरवेगार गवत खाण्यास मिळते. त्यामुळे त्यांचे आरोग्य चांगले राहते पर्यायाने या प्राण्यांपासून मुबलक प्रमाणात शुद्ध दूध मिळते व आपल्या आरोग्यास ते हितकारक असते.एवढी किमया ही बरसणाऱ्या पहिल्या पावसात असते.

पहिल्या पावसाच्या आगमनामुळे सृष्टीतील बदललेले सकारात्मक नवचैतन्य मनाला उभारी देते.विशेषतः शेतकरी राजा जास्त सुखावतो. बघितलं तर,या पृथ्वीतलावरील प्रत्येक सजीव घटक हा पहिल्या पावसासाठी आसुसलेला असतो. कारण त्याच्या बरसणाऱ्या थेंबांतून बदललेलं सृष्टी सौंदर्य मनात उच्च कोटीची प्रसन्नता निर्माण करते. नद्या-नाले तुडुंब वाहतात. ही सृष्टी जणू हिरवा शालू परिधान केल्याप्रमाणे भासते.वृक्षवेलीं वेगवेगळ्या रंगांच्या फुलांनी बहरतात. सुंदर फुलपाखरे झाड-वेलीवर आनंदाने फिरतात.पक्षी आनंदाचे गीत गातात.यामुळे सृष्टी सौंदर्यात अजून भर पडते.एवढी शक्ती या पहिल्या पावसाच्या आगमनामध्ये असते. आपण कितीही प्रयत्न करू देत की, आपल्या कितीही एकर शेताम ध्ये पाईपलाईन करून पिकांना पाणी पोहचू देत ठिबक सिंचन करू देत स्प्रिंकलरने पाणी देऊ देत, मात्र या पावसाच्या पडणाऱ्या एक- एक थेंबाने या जमीन माउलीचा कानाकोपरा भिजतो.एक इंच सुद्धा जमीन तो कोरडी ठेवत नाही.शेताच्या बांधावर, वनात जंगलात पडलेल्या वाळलेल्या गवताच्या काडीला वनातील बियांना तो अंकुरित करतो व सृष्टी चैतन्य करतो.या पहिल्या पावसाने डोंगरदर्यावरून वाहणारे धबधबे,निसर्गरम्य प्रेक्षणीय स्थळे सुद्धा आकर्षक दिसतात. ते मनमोहक दृश्य बघण्यासाठी पर्यटक गर्दी करतात. तेथे पावसात भिजतात.आनंद व्यक्त करतात. त्यामुळे पर्यटन स्थानाजवळील लोकांना रोजगार उपलब्ध होतो. गावाकडील लोकांना या गोष्टी फारशा विशेष नसतात कारण, ते सदैव निसर्गाच्या सानिध्यात डोंगर, दऱ्या, नदी नाल्यातील वाहणाऱ्या पाण्यासोबत वास्तव्यास असतात. मात्र शहरी भागातील लोकांना हे कौतुक वाटते म्हणून, ते या निसर्गरम्य पर्यटन स्थळांना भेटी देतात. अशाप्रकारे पहिला पाऊस हा निसर्गाचा आनंदोत्सव असतो. उष्णतेच्या दाहकतेने त्रस्त झालेला या सृष्टीतील प्रत्येक सजीव घटक सुखावतो.कोरडी धरणी म ाय हिरवाईने नटते. मातीचा सुगंध मनाला प्रसन्न करतो.लहान मुले पावसात भिजतात.नाचून आनंद व्यक्त करतात. पहिल्या पावसाच्या आगमनाने शेतकऱ्यांची पेरणीसाठी लगबग चालू होते व त्या दिशेने तो सर्व शेती उपयोगी वस्तूंची जुळवाजुळाव करतो. हीच तर खरी पहिल्या पावसाच्या आगम नाची किमया असते.

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ ता.जि.बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

### कान उघाडणी

खाजगीत करायची
नीत कान उघाडणी
सन्मानअसे प्रत्येकां
असो कसा अडाणी

सर्वांसमक्ष अपमान
गोष्ट रे लाजीरवाणी
शब्दांसहव्यामर्यादा
ताब्यात ठेवून वाणी

कायम उपदेश देता
रेवाचा कंटाळवाणी
अवस्था रे दीनवाणी

चारचौघातचं मुद्दाम
का करतो हेटाळणी
कुणाचे लागले अक्ष
आधी करे टेहाळणी

केवळ शब्द फेकीत
निर्माण आणि बाणी
ओळखून असे लोक
कितपत खोल पाणी

आपण बसे मेण्यात
भोई चाले अनवाणी
प्रखर विरोधी बनले
जे करतात विनवणी

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## धानोरा येथे पतीने केली पत्नीची हत्या;आरोपी फरार



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, बोरी :** बोरी पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या धानोरा देवगाव येथे गुरुवार, २५ जून रोजी एक धक्कादायक घटना घडली आहे. दारू पिण्यासाठी पैसे किंवा सोन्याची पोत देत नसल्याच्या कारणावरून पतीने आपल्या पत्नीच्या डोक्यात लोखंडी रॉड घालून तिची निर्घृण हत्या केल्याची चर्चा गावात सुरू आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. धानोरा देवगाव येथील आरोपी गजानन ज्ञानेश्वर कुटे (वय ४४ वर्ष) हा त्याची पत्नी व दोन मुलांसह राहत होता. गुरुवार, २५ जून रोजी दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास काही कारणावरून गजानन त्याची पत्नी मीरा हिच्यासोबत वाद झाला. या वादाचे रूपांतर मोठ्या भांडणात होऊन संतापाच्या भरात गजाननने पत्नी मीराच्या डोक्यात लोखंडी रॉड मारून तिचा खून केला.घरातून मोठ्या किंचाळ्या आणि ओरडण्याचा आवाज आल्याने आजूबाजूचे लोक गोळा झाले. मीरा रक्ताच्या थारोळ्यात पडलेली पाहून नागरिक चक्रावून गेले, मात्र मीराचा जागीच मृत्यू झाल्याचा अंदाज नागरिकांनी व्यक्त केला. यानंतर मयताचे पार्थिव बोरी येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले, तिथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून तिला मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच हिंगोली जिल्ह्यातील शेमसुरा (ता. कळमनुरी) येथील मृत मीराचे आई-वडील, भाऊ व इतर नातेवाइकांनी बोरी येथे रुग्णालयात धाव घेतली. नातेवाइकांच्या रडण्याच्या आवाजाने रुग्णालय व परिसर कमालीचा भावूक झाला होता. नातेवाइकांकडून या घटनेबाबत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

घटनेची माहिती मिळताच स. पो. नि. रामेश्वर धोंडगे यांनी धानोरा देवगाव येथे घटनास्थळाला भेट देऊन पंचनामा केला व तपास कामाला सुरुवात केली. पोलीस उपनिरीक्षक एस. एन. थोरवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी शेख वसीम, राजेश जटाळ, विशाल लाड, श्रीराम दंडवते, सय्यद दिशाण, हे पुढील काम पाहत आहेत. बोरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सायंकाळी उशिरापर्यंत सुरू होती.

## आसोला तलावात मासेमारीस गेलेल्या व्यक्तीचा बुडून मृत्यू



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, सावली (चंद्रपूर) :** सावली तालुक्यातील आसोला चक येथील गुरुदास जयराम मेश्राम (वय ३७) यांचा आसोला तलावात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुदास मेश्राम हे दि.२४ जून रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजताच्या सुमारास नेहमीप्रमाणे एकटेच आसोला तलावात मासेमारीसाठी गेले होते. मासेमारी करत असताना त्यांचा डोंगा अचानक पलटल्याने ते तलावाच्या खोल पाण्यात बुडाले. तलाव सुमारे २०० मीटर खोल असल्याने शोधकार्याला अडचणी आल्या.

घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन व ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत शोधमोहीम सुरू केली. मात्र अंधार पडल्याने व पाण्याची खोली जास्त असल्याने रात्री मृतदेहाचा शोध लागला नाही.

आज दि. २५ जून रोजी सकाळी ७ वाजता पोलीस व गावकऱ्यांच्या मदतीने पुन्हा शोधमोहीम राबविण्यात आली. त्यावेळी मृतदेहाचा शोध घेऊन तो पाण्याबाहेर काढण्यात आला. त्यानंतर पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी मुल येथील रुग्णालयात पाठविण्यात आला.

या कारवाईत ठाणेदार नितेश डोर्लीकर, सहायक पोलीस उपनिरीक्षक चाटे, चंद्रशेखर सिडाम, येनुनाथ मडावी, बळीराम बारेकर, सुरेश शेंडे, योगेश खोब्रागडे, दत्ताराव शिंदे तसेच ग्रामस्थांनी सहभाग घेतला.

मृत गुरुदास मेश्राम यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या अकाली निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती वाढीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन

### आमदार दातेंचा विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी आवाज




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, पारनेर (अहिल्यानगर) :** राज्यातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा प्रश्न पावसाळी अधिवेशनात प्रभावीपणे मांडत पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेतील लाभार्थी विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या अपुऱ्या शिष्यवृत्तीबाबत सरकारचे लक्ष वेधले. या प्रश्नावर उत्तर देताना सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी शिष्यवृत्तीच्या रकमेत महागाई निर्देशांकानुसार वाढ करण्याचा विषय शासनाच्या विचाराधीन असल्याची महत्त्वपूर्ण माहिती सभागृहात दिली.

आमदार दाते यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीमध्ये राज्यातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांचा पट वाढविण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेची सद्यस्थिती, प्रलंबित शिष्यवृत्ती आणि वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर शिष्यवृत्ती वाढीची गरज यावर सविस्तर प्रश्न उपस्थित केले. त्यांनी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरणातील विलंब, निधीची उपलब्धता आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानाचा मुद्दाही सभागृहात मांडला.

> आमदार काशिनाथ दातेंनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री शिरसाट यांनी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेतील शिष्यवृत्तीची रक्कम महागाई निर्देशांकानुसार वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे त्यामुळे राज्यातील लाखो विद्यार्थी व पालकांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आवश्यक असलेल्या शिष्यवृत्ती योजनांमध्ये सुधारणा आणि लाभार्थ्यांना अधिक आर्थिक सहाय्य मिळावे यासाठी आमदार दाते यांनी अधिवेशनात केलेली ही मागणी महत्त्वपूर्ण मानली जात असून, सरकारकडून मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे शिष्यवृत्ती वाढीचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे.

# आदिवासी जमिनीवरील अतिक्रमण विरोधात तहसीलसमोर उपोषण सुरू

## ढवळपुरीतील सतलोक आश्रमाविरोधात कारवाईची मागणी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, पारनेर (अहिल्यानगर) :** ढवळपुरी येथील आदिवासी जमिनीवरील कथित अतिक्रमण, बेकायदेशीर बांधकाम आणि जमीन बळकावल्याच्या आरोपांविरोधात अन्यायग्रस्त आदिवासी कुटुंबांनी गुरुवारपासून पारनेर तहसील कार्यालयासमोर उपोषणास सुरुवात केली आहे. आदिवासींच्या मालकीच्या जमिनीवरील कथित अतिक्रमण हटवून जमीन मूळ मालकांच्या ताब्यात द्यावी आणि संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

महादू तुकाराम पवार, दशरथ भाऊ केदार, खेवजी भिमा चिकणे, सुनिल उमाजी केदार, लिलाबाई सोमनाथ केवाळे, हिरामण नागु केदार आणि आनंदा दगडू केदार हे आदिवासी जमीनधारक उपोषणात सहभागी झाले




आहेत. ढवळपुरी येथील गट क्रमांक ११३०/२/१ ते ७ मधील सुमारे ४६ एकर आदिवासी जमिनीवर मुनिंदर धर्म ट्रस्ट (सतलोक आश्रम) यांच्या माध्यमातून कथितरित्या अतिक्रमण करून मोठ्या प्रमाणावर बांधकाम करण्यात आले आहे. त्यामुळे अनेक आदिवासी कुटुंबांना त्यांच्या हक्काच्या जमिनीपासून वंचित राहावे लागत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.उपोषणकर्त्यांनी संबंधित बांधकामासाठी आवश्यक शासकीय परवानग्या घेण्यात आल्या होत्या का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.

> **दोषींवर कारवाई होईपर्यंत हा लढा सुरूच**
>
> ढवळपुरीतील आदिवासी बांधवांच्या जमिनीचा प्रश्न हा केवळ जमिनीचा नाही, तर त्यांच्या अस्तित्वाचा आणि हक्काचा प्रश्न आहे. अनेक वर्षांपासून न्यायासाठी संघर्ष करूनही प्रशासनाने ठोस भूमिका घेतलेली नाही. त्यामुळे आदिवासी बांधवांना आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागला आहे. आदिवासींच्या जमिनीवरील कथित अतिक्रमण हटवून जमीन मूळ मालकांच्या ताब्यात देईपर्यंत आणि दोषींवर कारवाई होईपर्यंत हा लढा सुरूच राहील.
>
> **– लहू मधे, जिल्हाध्यक्ष – राया ठाकर फाउंडेशन**

तसेच संबंधित ठिकाणी सुरू असलेले धार्मिक कार्यक्रम तत्काळ बंद करून संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, असेही त्यांनी म्हटले आहे.यावेळी एकलव्य सेनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर अहिरे, राया ठाकर फाउंडेशनचे जिल्हाध्यक्ष लहू मधे, सह्याद्री आदिवासी ठाकर संघटनेचे जिल्हा सचिव संजय पथवे, आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर समाज सेवा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष नामदेव जाधव,राया ठाकर फाउंडेशनचे जिल्हा सचिव पाराजी जाधव, वसंत वारे, सुनील चिकने, संदिप केदारी, मारुती केदार, संजय केवळे, प्रविण केदार, बाळासाहेब चिकणे,जानकु केदार, साहेबराव केदार, देवराम केदार, भाऊसाहेब केदार,दामू केदार,आनंदा केदार, हिरामण केदार, दशरथ केदार, सुनील केदार,लिलाबाई केवळे,महादू पवार,सनी पारधी उपोषणस्थळी उपस्थित होते.

# उज्जैन-इंदूर, मडगाव, देहूरोड, मुंबईसाठी गाड्या सुरू करा

## भाजप नेते प्रणव परिचारकांचे मध्य रेल्वे महाप्रबंधकांना निवेदन

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२५, पंढरपूर :** पंढरपूर शहरातील प्रवासी, व्यापारी, विद्यार्थी तसेच लाखो भाविकांच्या सोयीसाठी विविध नवीन रेल्वे सेवा सुरू कराव्यात, काही महत्त्वाच्या गाड्यांचा विस्तार करावा तसेच पंढरपूर रेल्वे स्थानकावरील मूलभूत सुविधांमध्ये वाढ करावी, अशी मागणी भाजप नेते तथा क्षेत्रीय रेल उपयोगकर्ता परामर्श दात्री समिती, मुंबईचे सदस्य अॅड. प्रणव परिचारक यांनी मध्य रेल्वेचे महाप्रबंधक राजीव श्रीवास्तव यांच्याकडे केली आहे.

महाप्रबंधकांची पंढरपूरला भेटमध्य रेल्वेचे महाप्रबंधक राजीव श्रीवास्तव व मंडल रेल प्रबंधक सुजित मिश्रा यांनी पंढरपूर रेल्वे स्थानकाला भेट दिली. यावेळी अॅड. परिचारक यांनी त्यांच्याशी सविस्तर चर्चा करून विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. यामध्ये पंढरपूर-पुणे-देहूरोड अथवा पनवेलपर्यंत नवीन दैनिक इंटरसिटी/एक्स्प्रेस सुरू करावी. ही गाडी पंढरपूर, आळंदी व देहूरोड या धार्मिक स्थळांना जोडणारी ठरणार असून विद्यार्थी, नोकरदार व भाविकांसाठी उपयुक्त ठरेल. कोल्हापूर-सोलापूर-कोल्हापूर साप्ताहिक रेल्वे सेवा दर गुरुवारी सहा महिन्यांसाठी प्रायोगिक तत्त्वावर सुरू करावी. कोल्हापूर येथे गुरुवारी विनावापर असलेल्या रेकचा वापर करता येऊ शकतो. मडगाव-मिरज-पंढरपूर साप्ताहिक एक्स्प्रेस सुरू करावी. गोवा, कोकण व कर्नाटकातून



पंढरपूरला येणाऱ्या भाविकांसाठी ही सोयीची ठरेल. गोवा भवन उभारण्याच्या प्रस्तावामुळे या मागणीला विशेष महत्त्व आहे.

गाडी क्र. २२९४३/२२९४४ दौंड-इंदौर एक्स्प्रेस पंढरपूरपर्यंत वाढवावी. यामुळे सोलापूर जिल्ह्यातील प्रवाशांना उज्जैन, इंदौर, सुरत व वडोदरा येथे थेट रेल्वे सुविधा मिळेल. सध्या आठवड्यातून तीन दिवस धावणारी पंढरपूर-दादर एक्स्प्रेस दैनिक स्वरूपात सुरू करावी. पंढरपूर-कुर्डुवाडी मार्गावर लोकल सेवा सुरू करून कुर्डुवाडी जंक्शनमार्गे देशातील विविध भागांशी पंढरपूरची कनेक्टिव्हिटी वाढवावी. पंढरपूर रेल्वे स्थानकावर वृत्तपत्र व पुस्तक विक्री केंद्र, प्रधानमंत्री जनऔषधी केंद्र अथवा वैद्यकीय दुकान सुरू करावे. संपूर्ण स्थानक परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा उभारावी. अमृत भारत योजनेअंतर्गत सुरू असलेल्या विकासकामांना गती द्यावी. वाढती प्रवासी संख्या लक्षात घेऊन किमान दोन नवीन प्लॅटफॉर्म उभारून त्यावर लिफ्टसह आधुनिक सुविधा उपलब्ध कराव्यात. आदि मागण्या करण्यात आल्या आहेत. अॅड. प्रणव परिचारक यांनी सांगितले की, या सर्व मागण्यांवर रेल्वे प्रशासनाशी सकारात्मक चर्चा झाली आहे. पंढरपूर हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे तीर्थक्षेत्र असल्याने येथील रेल्वे सेवा व सुविधा जागतिक दर्जाच्या होणे आवश्यक आहे.

# श्री संताजी शैक्षणिक व सामाजिक विकास संस्थेतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, सातारा :**

श्री संताजी शैक्षणिक व सामाजिक विकास संस्था सातारा महाराष्ट्र यांच्या वतीने सातारा जिल्हा परिषद शाळा आंबवडे तर्फे भोंदवडे येथे शैक्षणिक साहित्य वाटपच्या अंतर्गत स्कूल बॅग वाटपाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला राजू भोसले उपाध्यक्ष सातारा जिल्हा परिषद सातारा हे आवर्जून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते मुलांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. यावेळी राजू भोसले यांनी आपले मनोगत व्यक्त करताना मराठी शाळांची सद्यस्थिती व त्यायोगे मराठी शाळांकडे बघण्याचा दृष्टिकोन यावरती लक्ष वेधले व आपली संस्था ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या मराठी शाळांमध्ये येऊन आज ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करत आहे, यासाठी मी संस्थेचे धन्यवाद व्यक्त करतो. आपण जो उपक्रम राबवत आहात व आपण आतापर्यंत जी कामे केलेली आहेत ती निश्चितच आपल्या संस्थेचा लौकिक वाढवणारी आहेत. आज समाजामध्ये खऱ्या अर्थाने आपल्यासारख्या संस्थांची नितांत गरज आहे. या मुलांना ज्यांच्या सौजन्याने या बॅगचे वाटप करण्यात येत आले त्या ग्रीननेस्ट अॅग्रो टुरिझम तापोळाच्या संचालिका लता पडगे यांचे मी शाळेचे वतीने धन्यवाद व्यक्त करतो. या निमित्ताने मी आपणाला सांगू इच्छितो की, आपल्या संघटनेला कोणत्याही प्रकारची मदत लागल्यास आपण आवर्जून माझ्याकडे यावे. मी व शिवेंद्रराजे भोसले यांच्या माध्यमातून आपल्या अडचणी निश्चितच आम्ही सोडवू व असे सामाजिक कार्यक्रम करण्यासाठी प्रोत्साहित करू.



संस्थेबद्दल माहिती देताना संस्थेचे अध्यक्ष राम पडघे म्हणाले आम्ही असे सामाजिक कार्यक्रम राबवताना नितांत गरज असलेल्या घटकाला निवडत असतो. या ठिकाणी गरीब होतकरू विद्यार्थी आहेत व त्यांना खरोखरच मदतीची गरज आहे याची माहिती आमच्या सभासदांनी घेतल्यानंतरच आम्ही या ठिकाणी हा कार्यक्रम घेतलेला आहे. संस्थेने आतापर्यंत अनेक सामाजिक कार्यक्रम राबवले आहेत. यामध्ये मुख्यत्वे २०१९ साली कोल्हापूर सांगलीच्या महापुराच्या वेळी सांगली जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये पूरग्रस्त बांधवांना एक महिना पुरेल इतके अन्नधान्य व इतर जीवना आवश्यक साहित्याची मदत केलेली आहे. २०२१ ला कोकण पुरामध्ये खेरडी चिपळूण या पूरग्रस्त बांधवांच्या पर्यंत पोहोचणारी पहिली संस्था ही आमची संस्था होती व त्या ठिकाणीही पूरग्रस्त बांधवांचे अश्रू पुसण्यासाठी व त्यांना मदतीचा हात देण्यासाठी संस्था त्या ठिकाणी पोहोचलेली आहे. महाबळेश्वर तालुक्यातील अतिदुर्गम भागामध्ये राहणाऱ्या कातकरी समाजासाठी कौटुंबिक साहित्याच्या मदतीचे फार मोठे काम संस्थेने केलेले आहे. आता नुकतेच तांबी रेवडी, तालुका कोरेगाव येथे पारधी समाज व गोसावी समाजाच्या कुटुंबाला कौटुंबिक साहित्याचे वाटप करून आपली सामाजिक बांधिलकी निभावण्याचे काम केले आहे. २०१९ च्या करोनाग्रस्त परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांना विविध साहित्याचे वाटप करण्याचे काम संस्थेने केलेले आहे. कोयना खोरे सारख्या अत्यंत दुर्गम भागामध्ये वैद्यकीय शिबिर घेऊन समाजाला याही बाबतीमध्ये मदत करण्याचे काम संस्थेने केलेले आहे. या शिवाय संस्था दरवर्षी विविध ठिकाणी वृक्ष लागवडीचा फार मोठा कार्यक्रम आयोजित करत असते व आपले सामाजिक व राष्ट्रीय कर्तव्य पूर्ण करत असते. अशा अनेक सामाजिक उपक्रमामध्ये संघटना अग्रेसर भूमिका निभावत असते.

संघटनेने ८० जी, १२ ऐ बी व भारत सरकारचे सीएसआर वन प्रमाणपत्र प्राप्त करून आपला एक वेगळा ठसा उमटवलेला आहे.

आज या ठिकाणी या कार्यक्रमाच्या निमित्ताने या विभागातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यामध्ये मौजे परळी गावचे सरपंच बाळासाहेब पाटील, आंबवडे गावचे सरपंच संजय गुजर, बबन देवरे, माजी पंचायत समिती सदस्य तानाजीराव गुजर, परळी येथील प्रतिष्ठित व्यापारी रेखाताई झगडे, माजी जि.प. सदस्य, विशाल गुजर, भोदवडे गावचे सरपंच दादासाहेब शिंदे, अध्यक्ष शाळा कमिटी नंदकुमार गुरव उपसरपंच परळी याशिवाय विष्णू पिंपळे, शरद देवरुखे, अंकुश मोरे, शशिकांत झगडे, अक्षय दळवी, गोविंद गंधाले मा.संचालक अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना, अमोल माने लक्ष्मी ज्वेलर्सचे मालक, भरत गुजर स्वप्न ज्वेलर्सचे मालक, शंकरराव गुजर तंटामुक्ती अध्यक्ष, दगडू भंडारे भोंदवडे, अजय काशीद माजी पंचायत समिती सदस्य, रोहिदास जगताप, सोमनाथ दळवी, धनसिंग शिंदे याशिवाय अनेक समाज बांधव या ठिकाणी उपस्थित होते.

यावेळी संघटनेचे विठ्ठलराव शिरसागर, उपाध्यक्ष पोपटराव भोज, सातारा जिल्हा समन्वयक युवराज खेडकर, कोरेगाव तालुका समन्वयक अनिल किरवे, सातारा तालुका अध्यक्ष राजेंद्र किरवे, जावली तालुका अध्यक्ष प्रवीण रोकडे, वाई तालुका अध्यक्ष शिवदास किरवे, माण तालुका अध्यक्ष शिवाजीराव गंधाले, सातारा तालुका समन्वयक सुरेखा हाडके, महिला अध्यक्ष गौरी देशमाने, सातारा शहर अध्यक्ष प्रवीण किरवे, जावली तालुका समन्वयक लता पडगे (संचालिका ग्रीननेस्ट अॅग्रो) याशिवाय अनिल किरवे, दौलत किरवे, अरुण किरवे, बबन किरवे, मारुती शिरसागर, संजय भोज, प्रिया गंधाले इत्यादी आवर्जून उपस्थित होते.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका कदम मॅडम, शिंदे सर व इतर त्यांचे सहकारी आवर्जून उपस्थित होते व या सर्वांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अत्यंत मोलाचे योगदान दिलेले आहे. कदम मॅडम यांनी आपले प्रास्ताविकामध्ये सर्वांचे स्वागत करून संस्थेच्या कार्याबद्दल धन्यवाद व्यक्त केले.

# थर्ड आऊटर रिंग रोड गाजनार ! शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष

## शेतकरी संघर्ष सेनेची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२४, नागपूर :** प्रस्तावित थर्ड आऊटर रिंग रोड प्रकल्पामुळे नागपूर जिल्ह्यातील शेतकरी कमालीचे आक्रमक झाले आहेत. जमीन संपादन, मोबदल्याचे निकष आणि पुनर्वसनाबाबत प्रशासनाकडून कोणतीही स्पष्ट माहिती न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये भीती आणि तीव्र असंतोषाचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर २४ जून बुधवारला दुपारच्या सुमारास शेतकरी संघर्ष सेना जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. यावेळी बाधित शेतकऱ्यांच्या वतीने नागपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना थेट निवेदन देण्यात आले

शेतकरी संघर्ष सेनेचे नेते सारंग झाडे यांनी प्रशासकीय कारभारावर तीव्र आक्षेप घेतला आहे. एनएमआरडीएकडून (NMRDA) सध्या बाधित क्षेत्राचे पॉईंट मॅपिंग आणि ड्रोन सर्व्हे सुरू करण्यात आले आहेत. मात्र, नेमकी किती जमीन जाणार? मोबदला काय मिळणार? याबाबत कोणतीही अधिकृत माहिती शेतकऱ्यांना देण्यात आलेली नाही.

प्रशासनाने घाईघाईने सुरू असलेल्या प्रक्रियेमुळे शेतकरी वर्गात संशयाचे भूत निर्माण झाले आहे. कोणत्याही विकास प्रकल्पापूर्वी शेतकऱ्यांना विश्वासात घेणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. पुरेशी माहिती न देता जर सर्व्हे होणार असतील, तर शेतकरी गप्प बसणार नाही असे शेतकरी संघर्ष सेनेचे सारंग झाडे म्हटले आहे.



जिल्हाधिकारी आणि एनएमआरडीएच्या अध्यक्षांना सादर करण्यात आलेल्या निवेदनात थर्ड आऊटर रिंग रोड प्रकल्पाची संपूर्ण आणि खरी माहिती शेतकऱ्यांसमोर जाहीर करावी, जमीन संपादन, पुनर्वसन आणि मिळणारा मोबदला याबाबतचे धोरण आधी स्पष्ट करा, तालुकानिहाय वेगवेगळ्या बैठका घेऊन शेतकऱ्यांमध्ये फूट न पाडता, सर्व बाधितांची एकच ‘संयुक्त जनसुनावणी’ घेण्यात यावी, शेतकऱ्यांच्या शंका आणि हरकती अधिकृतपणे नोंदवून त्यावर प्रशासनाने लेखी स्पष्टीकरण द्यावे, शिवाय शेतकऱ्यांना संपूर्ण माहिती देऊन विश्वासात घेतल्याशिवाय पुढील कोणतीही प्रशासकीय प्रक्रिया किंवा सर्व्हे राबवू नये अश्या मागण्या करण्यात आल्या आहेत. केवळ निवेदन देऊन शेतकरी थांबणार नसून या प्रकल्पाची कुंडली बाहेर काढण्यासाठी आज माहितीच्या अधिकाराखाली अर्ज देखील सादर केला जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# कर्जतमधील वीज समस्यांवर राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचा महावितरणवर जनआक्रोश मोर्चा

**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.२५, कर्जत :** कर्जत शहर व परिसरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या वारंवार वीज खंडित होण्याच्या समस्यांविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्या वतीने आज महावितरणच्या कर्जत कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये कर्जत शहरातील नागरिक, व्यापारी, शेतकरी तसेच पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

टिळक चौक येथे नागरिक एकत्र जमल्यानंतर मोर्चाला सुरुवात करण्यात आली. घोषणाबाजी करत मोर्चा शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने महावितरण कार्यालयावर धडकला. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने महावितरणचे उप कार्यकारी अभियंता केंद्रे यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली.



यावेळी कर्जत शहरातील वाढत्या वीज समस्यांबाबत, वारंवार होणारी वीज कपात, कमी-जास्त व्होल्टेज, सकाळ-संध्याकाळ होणारे वीज खंडित होणे तसेच नागरिकांना होणारा त्रास याबाबत शिष्टमंडळाने निवेदनाद्वारे तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यानंतर उप कार्यकारी अभियंता केंद्रे यांना लेखी निवेदन सुपूर्द करण्यात आले.

निवेदन स्वीकारल्यानंतर केंद्रे यांनी सरकारकडून उपलब्ध होणाऱ्या निधीतून आवश्यक विकासकामे आणि दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात येतील, असे आश्वासन दिले. तसेच नागरिकांनी कोणत्याही अफवा अथवा भूलथापांना बळी पडू नये, महावितरण आपल्या जबाबदारीनुसार काम करीत असून वीज पुरवठा अधिक सुरळीत करण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

सकाळी व संध्याकाळी होणारे वीज खंडित होण्याचे प्रकार कसे कमी करता येतील, त्यासाठी कोणते नियोजन करण्यात येत आहे तसेच भविष्यातील वीज व्यवस्थापनाबाबत सविस्तर माहितीही त्यांनी शिष्टमंडळाला दिली. अधिकाऱ्यांनी दिलेल्या सकारात्मक आश्वासनानंतर निवेदन देऊन मोर्चाची सांगता करण्यात आली.

याप्रसंगी कर्जत शहराध्यक्ष ॲड. भाऊसाहेब मोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे चंद्र पवार, कर्जत उपाध्यक्ष राम देशमुख, कर्जत सचिव दिलीप बुंधाटे, मधुकर पाटील, सामाजिक कार्यकर्ते आनंद धेंडे तसेच पक्षाचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

सदर मोर्चा शांततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडल्याबद्दल शहराध्यक्ष ॲड. भाऊसाहेब मोरे यांनी सर्व कार्यकर्ते, नागरिक आणि पोलिस प्रशासनाचे आभार मानले.

# पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या उपस्थितीत जिंतूरात भव्य रोजगार मेळावा

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२५, जिंतूर :** शहरासह तालुक्यातील बेरोजगार युवकांसाठी एक मोठी आणि दिलासादायक संधी उपलब्ध झाली असून, पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या उपस्थितीत ‘सुरक्षा रक्षक युवा रोजगार भरती मेळावा २०२६’चे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमासाठी नगरसेवक गोपाळ रोकडे यांनी पुढाकार घेतला असून, स्थानिक युवकांना थेट रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात आहे. जिंतूर शहरात प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणावर सुरक्षा क्षेत्रातील भरती मेळावा आयोजित होत असल्याने युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



हा भरती मेळावा दि. २६ जून ते २८ जून २०२६ दरम्यान श्रीमती सुकृती बोडके महाविद्यालय, पळसखेड रोड, जिंतूर येथे होणार आहे. दररोज सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत ही भरती प्रक्रिया चालणार असून, जिंतूरसह परिसरातील युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या रोजगार मेळाव्यात सुरक्षा रक्षक, सुरक्षा सुपरवायझर, हाऊस किपिंग आणि ड्रायव्हर अशा विविध पदांसाठी भरती होणार असून, एकूण ४०० पदांसाठी उमेदवारांची निवड केली जाणार आहे.

युवकांसाठी रोजगाराची मोठी संधी

सध्या बेरोजगारीच्या प्रश्नामुळे ग्रामीण भागातील अनेक युवक संभ्रमात असताना, जिंतूरमध्ये आयोजित करण्यात आलेला हा रोजगार मेळावा त्यांच्या भविष्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

विशेष म्हणजे, ८ वी पास ते पदवीधर अशा विविध शैक्षणिक पात्रता असलेल्या युवकांसाठी या भरतीमध्ये संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. केवळ उच्चशिक्षितच नव्हे, तर कमी शिक्षण घेतलेल्या युवकांनाही नोकरीची संधी देण्याचा प्रयत्न या भरती मेळाव्यातून होत असल्याचे दिसून येते.

जिंतूर तालुक्यातील युवकांना रोजगारासाठी मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागते. अनेकदा माहितीअभावी किंवा योग्य मार्गदर्शन नसल्याने चांगल्या संधी हातातून निसटतात. अशा परिस्थितीत नगरसेवक गोपाळ रोकडे यांनी घेतलेला पुढाकार हा स्थानिक युवकांसाठी अत्यंत मोलाचा ठरत आहे. रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून युवकांना थेट भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार असून, यामुळे त्यांचा वेळ, पैसा आणि धावपळ वाचणार आहे.

# कुक्कीवॉन आंतरराष्ट्रीय तायक्कांदो शिक्षण कार्यक्रमात Warior Taekwondo Academy ची दमदार कामगिरी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, मुंबई :** Warrior Taekwondo Academy ने आणखी एक अभिमानास्पद यश संपादन केले आहे. अकादमीचे मुख्य प्रशिक्षक मंगेश औटी आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी २० व २१ जून रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित कुक्कीवॉन आंतरराष्ट्रीय तायक्कांदो शिक्षण कार्यक्रमात यशस्वी सहभाग नोंदवला.

हा जागतिक दर्जाचा कार्यक्रम ISSO, ISF Academy आणि कुक्कीवॉन (जागतिक तायक्कांदो मुख्यालय, दक्षिण कोरिया) यांच्या संयुक्त विद्यमाने नीता मुकेश अंबानी ज्युनिअर स्कूल, मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता. भारतातील तायक्कांदो प्रशिक्षकांचे दर्जात्मक उन्नतीकरण, तांत्रिक कौशल्यविकास आणि खेळाडू घडविण्याच्या प्रक्रियेला बळकटी देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या प्रतिष्ठित कार्यक्रमात Warrior Taekwondo Academy चे मुख्य प्रशिक्षक मंगेश औटी यांच्यासह श्रीजा कहाडणे, सार्थक जौरत, समर्थ मोटे, वेदांत कोर्डे, हर्ष कनौजिया, मायकल ॲग्रेल, साई लांडेगे आणि आर्या राज या विद्यार्थ्यांनी प्रतिनिधित्व केले. सहभागी विद्यार्थ्यांना पूमसे आणि क्योरुगी या प्रकारांमध्ये प्रगत प्रशिक्षण देण्यात आले. तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रशिक्षकांकडून आधुनिक कोचिंग पद्धती, उच्चस्तरीय तांत्रिक मार्गदर्शन




आणि स्पर्धात्मक तयारीबाबत मोलाचे ज्ञान मिळाले. या उच्चस्तरीय कार्यक्रमातील यशस्वी सहभागातून Warrior Taekwondo Academy ची शिस्त, गुणवत्ता, उत्कृष्टता आणि सातत्यपूर्ण प्रगती यांप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित होते. आपल्या विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण आणि मोठ्या संधी उपलब्ध करून देत, अकादमी भविष्यातील सक्षम आणि यशस्वी खेळाडू घडविण्याचे कार्य सातत्याने करत आहे.

# थोडक्यात

## पावसाळी कालावधीतील मदतकार्यासाठी नवी मुंबई मनपाची यंत्रणा सज्ज

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२५, नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेची आपत्कालीन यंत्रणा पावसाळी मदतकार्यासाठी सज्ज असून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्याकडून पावसाळी स्थितीचा व नवी मुंबईतील परिस्थितीचा नियमित आढावा घेतला जात आहे. नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात मध्यवर्ती आपत्ती नियंत्रण कक्ष असून त्याठिकाणी अहोरात्र २४द७ मनुष्यबळ व यंत्रणा दक्षतेने कार्यरत आहे. त्याचप्रमाणे नवी मुंबई महानगर पालिकेच्या आठही विभाग कार्यालय क्षेत्रात २४द७ नियंत्रण कक्ष कार्यान्वित आहेत. तसेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या पाचही आग्निशमन केंद्रांमध्ये तत्पर मदत कार्यासाठी कृतीदल सज्ज आहे.



नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील काही भाग हा समुद्र सपाटीपासून खालच्या पातळीवर असून अशा अतिसखल भागामध्ये काही प्रमाणात पाणी साचते हे लक्षात घेऊन त्याठिकाणी पाणी उपसा पंप कार्यान्वित ठेवण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे विभाग कार्यालयातील मदतकार्य पथक आपापल्या क्षेत्रात फिरुन रस्त्याच्या कडेला गटारात पाणी वाहून जाणाऱ्या वॉटर एन्ट्रीमध्ये काही अडथळे येऊन पाणी साचल्याचे निदर्शनास आल्यास त्या ठिकाणी जाऊन वॉटर एन्ट्री खुल्या करुन पाण्याचा निचरा करून देण्यासाठी वाट करुन देत आहेत. त्याचप्रमाणे वाऱ्यामुळे कुठे झाडांच्या फांद्या पडून वाहतूकीला व रहदारीला अडथळा येत असल्यास त्या ठिकाणी पोहचून फांद्या हटवून वाहतूक सुरळीत केली जात आहे.

पावसाळी कालावधीत नागरिकांना महानगरपालिकेशी संपर्क साधण्याकरिता नियंत्रण कक्षांचे संपर्कध्वनी क्रमांक जाहीर करण्यात आले आहेत.

तात्काळ कृती केंद्र नमुंमपा मुख्यालय – २७५६७०६० / २७५६७०६१
१८००२२२३०९ / १८००२२२३१० (टोल फ्री क्रमांक)
बेलापूर विभाग कार्यालय – २७५७०६१० / २७५७३८२६
नेरुळ विभाग कार्यालय – २७७०७६६९ / २७७१३२१२
वाशी विभाग कार्यालय – २७६५५३७० / २७६५९७४१
तुर्भे विभाग कार्यालय – २७७५४०६१ / २७८३४०६९
कोपरखैरणे विभाग कार्यालय – २७५४२४०६ / २७५४२४४९
घणसोली विभाग कार्यालय – २७६९२४८९ / २७६९८१७५ / ७३०४०४५३१६
ऐरोली विभाग कार्यालय – २७७९२११४ / २७५६७२९८
दिघा विभाग कार्यालय – ९१३६५४४०२७ / ९१३६५९४०२८
अग्निशमन केंद्र सीबीडी बेलापूर – २७५७२११६ / २७५७२१११
अग्निशमन केंद्र नेरुळ – २७७०७१०१
अग्निशमन केंद्र वाशी – २७६६०१०१ / २७८९४८०० / २७८९५९००
अग्निशमन केंद्र कोपरखैरणे – २७५४११०१
अग्निशमन केंद्र ऐरोली – २७७९६६०० / २७७९११०८ / २७७९२१०८

तरी नागरिकांनी कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी आपल्या नजीकच्या विभाग कार्यालयातील नियंत्रण कक्षाशी अथवा महापालिका मुख्यालयातील नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा व कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन करण्यात येत आहे.

## नगर परिषद देगलूर येथे ‘अंतरराष्ट्रीय विधवा दिनी’ एकल महिला मेळावा संपन्न

**अक्षराज : अब्दुल.मुबिन**

**दि.२५, देगलूर (नांदेड) :** मा.मंत्री, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य आणि मा. आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या सूचनांनुसार आज, दिनांक २३ जून २०२६ रोजी नगर परिषद देगलूर येथे अंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त विशेष एकल महिला दिन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात देगलूर शहरातील सुमारे २७० विधवा, घटस्फोटित व परित्यक्ता एकल महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.'एकल महिला धोरणा'साठी महिलांचे अभिप्राय नोंदवले शासनाला सर्वसमावेशक 'एकल महिला धोरण' निश्चित करण्यात मदत व्हावी, या उद्देशाने या मेळाव्यात उपस्थित महिलांकडून विविध मुद्द्यांवर लेखी व तोंडी अभिप्राय नोंदवून घेण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने रोजगार आणि स्वयंरोजगार संधी, मालमत्ता हक्क विषयक कायदेशीर बाजू,निवारा व घरकुल योजना, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी,न्यायालयीन प्रक्रियेतील कायदेशीर अडचणी, आणि यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर महिलांनी आपल्या प्रतिक्रिया व सूचना मांडल्या.




**मान्यवरांचे मार्गदर्शन :**

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देगलूर नगर परिषदेचे स्वीकृत सदस्य सय्यद मोहियोद्दीन अहेमदसाब हे होते. यात्रसंगी उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना नगर परिषद देगलूरच्या आस्थापना विभागाच्या डॉ. विजया येरगुलवार, लेखापाल स्वाती क्षत्रिय आणि नारीशक्ती शहरस्तर संघाच्या अध्यक्षा श्रीमती शारदा सुभाष पाटील यांनी एकल महिलांना धीर दिला. महिलांनी स्वतःचे छोटे-मोठे उद्योग सुरू करून स्वावलंबी बनावे, शासकीय योजनांचा लाभ घ्यावा आणि समर्थपणे आपल्या कुटुंबाची जबाबदारी स्वीकारून प्रगती साधावी, असे बहुमोल मार्गदर्शन मान्यवरांनी केले.संकटांवर मात करून एकल महिलांनी समाजासमोर एक नवा आदर्श उभा करावा. प्रशासन आणि समाज नेहमी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून देगलूर शहरातील विविध क्षेत्रांत संघर्ष करून यशस्वी झालेल्या काही एकल महिलांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नगर परिषदेच्या जन्म-मृत्यू विभागाच्या अश्विनी राठोड व नागमनी भुताळे, तसेच छणडच् (राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान) विभागाचे ज्योती वाघमारे आणि कपिल कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले. मेळाव्याच्या सांगतेवेळी उपस्थित महिलांनी या उपक्रमाबद्दल नगर परिषदेचे आभार मानले.